१९२०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय [illegible]
सं. न. ४४[illegible]
डिकार्याची ... ठाणे.

# प्रसन्न-राधा.

( खंडकाव्य. )

लेखक.

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी,
शेंदुर्णीकर

REFBK-0001828

आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७८२८

॥ ॐ नमः श्रीअंबिकायै. ॥

# प्रसन्न-राधा.

लेखक व प्रकाशक

दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी-शेंदुर्णीकर,

फर्स्ट असि० मास्तर, मेहुणबारें

( प्रथमावृत्ति, प्रति ५००. )

आगष्ट १९२०,

मुद्रक.

दत्तात्रय गोविंद सडेकर,

'धनंजय' प्रेसचे मालक,

खानापूर-बेळगांव.

( ग्रंथकर्त्याने सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत )

किंमत ८६ आणे



सौ०—राधाबाई तिवारी.

फोटोग्राफर-वी व्ही अगाशे

# हे स्वर्गस्थ देवि! हें तुला.

REFBK 0001828
REFBK-0001828

# प्रस्तावना.

माझे मित्र प्रसिद्ध विद्वान कवि श्री० दु. आ. तिवारी यानीं **प्रसन्न-राधा** काव्यास प्रस्तावना लिहिण्याची ऐन वेळेवर मला सूचना केल्यामुळे मी हें काम आज पहिल्यानेंच हातीं घेतलें आहे. प्रस्तावना लिहिणें ह्मणजे ग्रंथकर्त्यांच्या कृतींतील निवडक उतारे देऊन दोषांपेक्षां गुणांचीच प्रशंसा यथेच्छ करावी व शेवटीं अमूक अमूक मला असें वाटतें ह्मणून वाचकांनींही या कृतीचे गोडवे गावे, असें वकिली थाटाचें समर्थन करून ग्रंथकर्त्यांच्या कृतीविषयीं मार्मिकवाचकाचें जें कांहीं प्रामाणिक मत होईल, तें दडपून टाकावें, ही गोष्ट मला मुळींच संमत नाहीं त्या योगानें वाचकाची अभिरुचि बिघडते, अशी माझी समजूत आहे. तेव्हां येथें गतानुगतिकत्वाचा मार्ग न स्वीकारितां वाचकांनीं कवीची कृति कोणत्यादृष्टीनें पहावयाची, काव्याचें स्वरूप कोणतें हें दाखवून त्याचें थोडे स्पष्टीकरणही केलें आहे. तें वाचून सदर काव्य चांगलें किंवा वाईट ठरविणें मी वाचकांवर सोपविणार आहे.

एखाद्या नदीचा प्रवाह अप्रतिहतपणे चालण्यास तींतील पाण्याचा उगम हा निसर्गत.च व्हावा लागतो. तींत बाहेरून उसनें आणून टाकिलेलें पाणी हें कार्य करावयास पूर्णपणें असमर्थ असतें. हीच गोष्ट काव्याची. त्याचा

ओघ अस्खलितपणें चालावयास स्फूर्तिही स्वाभाविकच पाहिजे. प्रयत्न साध्य कृत्रिमशब्दांच्या सांगाड्यानें त्याचा अस्खलितपणा राखतां येणें केवळ अशक्य होय. मग त्यापासून वाटणारा आनंद व रमणीयता तर लांबच ! ! प्रतिभाप्रेरित काव्यांत श्रोताच्या प्रत्येक अणुरेणूंत एक-प्रकारची दिव्यसृष्टि उत्पन्न करण्याची शक्ति असते. ती या शाब्दिक डोलाऱ्याच्या सजविलेल्या निर्जीव कणांत कशी असणार ?

मानवी देह अणुरेणूपासून बनला आहे व त्या प्रत्येक अणुरेणूंत—रोमारोमांत—चैतन्य उत्पन्न करून एकंदर देह चालता बोलता करितां येण्याकरितां देह घटनेनंतर ब्रह्मदेवास त्यात एक प्रकारची ' आत्मा ' ह्मणून दिव्य-शक्ति कानांत फूंकर मारून घालावी लागते त्याखेरीज त्याचें कार्य पुरें होऊं शकत नाहीं. त्यानतर त्यानें केलेल्या कृतीची नीच किंवा उच्च ही परीक्षा जगाच्या दृष्टीनें होणें पुढें अवलबून असतें. तसेंच काव्याचे ! काव्याचे अणुरेणु ह्मणजे प्रत्येक शब्द ! त्यांच्या बेमालूम मांडणीनंतर त्यांत एकप्रकारचें चैतन्य भरावयाचें कार्य शिलकच राहतें. व तें कार्य एकट्या खऱ्या कविखेरीज कोणासही करितां येणें कधीं शक्यच नाहीं. हें चैतन्य उत्पन्न करण्याकरिता कवीस आपलें काव्य त्याशीं पूर्ण तादात्म्य पावून पुन्हां पुन्हां वाचून उत्पन्न करावें लागतें. व तें ज्यावेळीं त्याच्या स्वतःच्या हृदयास चटका लावूं

शकतें; तेव्हांच इतरांचीं हृदयें हालवून सोडण्यास तें समर्थ होतें एवढेंच काय पण कवि विषयाशीं अशारीरतेनें पूर्णपणें तन्मय होऊन जी एकप्रकारची काल्पनिक, रमणीय पण दिव्य अशी नवीन सृष्टि आपल्या ज्ञानचक्षु-पुढे रचीत असतो तींतही तो पुन्हां इतका व्यग्र झालेला असतो कीं त्यास या बाह्यसृष्टीचें अजिबात विस्मरण पडून तो त्या नूतन स्वयंरचित जगाच्या सुखदुःख, आनंद, समाधान वगैरे तरंगांशीं एकजीव होऊन स्वतांच्या दांडग्या अनुभवानें तेथील परिस्थितीशीं टक्कर देत असतो. अशावेळीं त्याच्या हृदयास निरनिराळ्या प्रकारें पीळ पडून उत्पन्न झालेला रस या नितांत रम्यतेच्या प्रवाहा-बरोबर रसवंतीबाहेर सारखा स्रवूं लागतो व त्यासच भाषानैपुण्याची जोड मिळाल्यावर तो जीवंत काव्याच्या स्वरूपानें ह्या बाह्य जगापुढें येत असतो. आनंदी मनु-ष्याचें हृदय दुःखानें करपून टाकण्याचें अथवा दुःखी अंतःकरणावर हर्षाचे मंद शीतवारे वाहावयास लावण्याचें तसेंच रक्तास रोमारोमांत उसळी मारावयास लावणारें किंवा प्रसंगीं धीरगंभीर हृदयासही भीतीनें कंप देण्याचें जर कुठें सामर्थ्य वसत असेल तर तें असल्या काव्य संजीविनीच्याच ठायीं !! मूळ स्थितीचा विसर पाडून वेगळ्याच प्रांतात नेणारी व तेथें मनसोक्त भराऱ्या मारीत विहार करावयास लावणारी जर कोणती दिव्यशक्ति असेल तर ही कविता देवीचीच ! तिची जेवढी महती

शावी तवढी थोडीच. वर वर्णन केलेली मनःस्थिति, अनुभव, कल्पना वगैरे ज्या वाचकांच्या प्रत्यक्ष अनुभवास आल्या असतील त्यांच्या अंतःकरणास हें काव्य इतर वाचकापेक्षां एकप्रकारच्या निराळ्याच विकारांनीं चालन देऊन त्यास अशी शंका आणतें कीं, “ काय ? कवीचा हा स्वतांचा अनुभव असेल काय ? कीं ही नुसती अनुभव-शून्य वाऱ्यावरची बडबड आहे ? छे ! कवीनें प्रतिपादन केलेलीं सर्व तत्वें मी जरी अनुभवलीं आहेत तरी तितका हा सर्व अनुभव त्यास मुळींच नसेल. त्यानें तीं केवळ कल्पनेनें रेखाटलेलीं आहेत. ” अशा तऱ्हेनें शंकेचें रूपांतर गोड अहंकारांत होऊं लागतें व किति तरी वेळ याच अहंकारानें त्याचें मन व्याप्त झालेलें असतें. हा गोड अहंकार उत्पन्न करण्याची कुवत शब्दांनीं बनविलेल्या मालिकेंत नसते तर जिवंतकाव्याच्या आत्म्याच्याठायींच ती संभवते. कारण, कवीच्या कल्पनासृष्टींतील प्रत्येक तत्व हें रसिक वाचकांच्या व्यावहारिक अनुभवाशीं पूर्णपणे कसाला उतरलेलें असतें. तें इतकें कीं एखादेवेळीं खरोखरींच तें कवीच्या प्रत्यक्ष अनुभवाला नसतांही नुसतें कल्पना-सृष्टींतून निर्माण करून वाचकांपुढें ग्रथित केलेलें दिसून मात्र येते. पण वाचकास त्याचा अक्षरशः प्रत्यय आलेला असतो आतां कित्येक ठिकाणीं असेही असू शकेल कीं, जें प्रत्यंतर कल्पनासृष्टींत वर्णित असून प्रत्यक्ष कवीच्याही तें अनुभवास आहे. पण त्याचा प्रत्यय कधीं कधीं

वाचकांस नसतोही. पण आपणास इतर प्रकारची चर्चा न करितां पहिल्या प्रकाराकडेच लक्ष पुरविले पाहिजे. अशा तऱ्हेनें कवीचें कल्पनाचित्रितचित्र हें वाचकांच्या कसोटीस उतरलें ह्मणजे तें त्यांच्यावर चांगला परिणाम करितें.

असें परिणामकारक काव्य व्हावयास विषयाशीं तादात्म्य पावून तो हृदयस्पर्शी झाल्यावर अंतःकरणांतील प्रत्येक विकार बाहेर बोलून दाखविण्यास कवीचे भाषेवर प्रभुत्व पाहिजे हें प्रभुत्व नसेपर्यंत त्याचे बोबडे शब्द आपल्या विचाराशीं रसिक वाचकांचे विचार समरस करूं शकत नाहींत. एवढ्याकरितां खऱ्या कवीच्या आंगीं प्रतिभा-जागृती बरोबरच त्याच्या अगाध काव्यवाचनामुळें योग्य तें भाषा प्रभुत्वही पाहिजे अशाप्रकारें योग्य परिणामकारक बनलेल्या शब्दचित्रासच खरें काव्य ह्मणतां येईल. ह्या विवरणास धरून कवीच्या लेखणींतून सदर काव्य कसें उतरलें हें वाचकांस ठरवितां येणें आता फारसें कठीण नाहीं. ज्या वाचकांस आह्मी हा एकप्रकारचा चष्मा देऊन काव्य निरीक्षण करावयास सांगितले असतां तें त्यांना दिसूं शकत नाहीं. त्यांना आह्मी कितीही उताऱ्यांचीं गोड गोड वर्णनें करून पटवूं ह्मटलें तरी तें कोठचें समजणार ?

आटोपतें घेता घेता या काव्यांतील उत्कट व दिव्य-प्रेमाचा येथें उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. प्रेम हें प्रथम शरिरानें उत्पन्न होतें खरें. पण पुढें जसजसे त्याचे

दिव्य स्वरूप व पवित्रपणा वाढत जातो तसतसा शारिरिक संबंध शिथिल होऊन अखेर तो कायमचा तुटतो व त्या उज्वल प्रेमाचा शरिरांतील आत्म्याच्याठायीं संचार होत जातो. याठिकाणीं दोन्हीं आत्म्यांतील हें प्रेम निष्काम कोटीस जाऊन पोंचल्यावर आपल्या प्रेमविषयाचें जें सौख्य तें आपलें. व त्याचें जें दुःख तेंच केवळ आपले दुःख. अशी भावना प्रेमी मनुष्याच्या मनांत प्रगट होते. इतकेंच नव्हे तर आपल्या प्रेमविषयाच्या सौख्यापुढें आपल्या स्वतःचेंही सौख्य तुच्छ मानून तो तनुमनेंकरून निर्हेतुकं अहर्निश झटत असतो असें स्थित्यंतर होतां होतां त्याची पूर्ण उत्क्रांति झाली ह्मणजे त्यालाच आपण स्वर्गीय प्रेम ह्मणतों.

या काव्यांतील राधा व कृष्णाच्याठायी ज्या पवित्र-प्रेमाचा कवीनें उद्भव केला आहे. त्याचें पावित्र्य व दिव्यत्व, राधेचा माधवाशीं व कृष्णाचा रुक्मिणीशीं कवीनें मोठ्या कुशलतेने विवाह घडवून चांगलेंच दाखविलें आहे. इतर प्रसंगांतही या रसाचा परिपोष मोठ्या बहारीनें केला असल्यानें हें काव्य खऱ्या प्रेमाची विटंबना करणाऱ्यांना आदर्शभूत होण्यासारखे आहे.

असो. एकंदरींत कविवर्य तिवारी यांच्या ह्या व इतर ‘ प्रतापसुंदरी ’ ‘ मनोहर लीला ’ वगैरे खंड काव्यांकडे निर्भीड व मार्मिक दृष्टि फेंकली असतां कविवर्य तिवारी

दांच्याठायीं महाकवीस लागणारी प्रतिभा व भाषाप्रभुत्व वगैरे सामुग्री यथायोग्य आहे. ते अशाच तऱ्हेनें आपल्या गगनविहारी प्रतिभेच्या व अनुपमेय भाषा प्रभुत्वाच्या जोरावर मराठी भाषेस ललामभूत होऊन राहणाऱ्या निरनिराळ्या काव्यांस जन्म देऊन वाङ्मयाची अखंड सेवा करण्याचें व्रत चालू ठेवतील अशी अपेक्षा आहे.

या कसलेल्या कवीच्या ह्या खंडकाव्याच्या प्रकाशनार्थ ज्या उदार धनिकांनीं ( नांव प्रगट करण्याची परवानगी नाहीं ) मुद्रणाचा संपूर्ण खर्च दिला त्यांना महाराष्ट्र काव्य रसिकास जाणून घेण्याची अवश्य जिज्ञासा होईल. हे ! उदार रसिका! तू आपल्या शालीनतेनें जरी अप्रगट राहूं इच्छित असशील, तरी हा कविकोकीळ उडून येऊन कोणत्या आम्रवृक्षावर बसला आहे. हें जाणावयास त्याच्या कंठबांसरीचे मंजूळ ध्वनि पुरे आहेत.

जळगांव, ता० ९।४।१९२०. } केशव महादेव सोनाळकर, वकील.

## पुस्तककर्त्याचे चार शब्द.

आधुनिक मराठी कवितेचे अभिमानी पुष्कळ आहेत हें सिद्ध करण्याकरितां आणि केवळ तिची उन्नति व्हावी ह्मणून तिचा सक्रिय पुरस्कार करितांना आपल्या नांवाचा गाजावाजा व्यास करावासा वाटत नाहीं अशा सावर्दे येथील एका महाशयांनीं स्वतःच्या खर्चानें हें पुस्तक प्रकाशित करून मला अत्यंत ऋणी करून ठेविलें आहे. त्यांचें तें ऋण मजकडून कसें फिटेल तें फिटो !

सर्व पुस्तकांत येथून तेथून या थोर पुरुषाच्या नांवाचा कुठे ध्वनीही नाहीं याला केवळ या महाशयाची महदिच्छाच कारण आहे. सत्कार्य करणारी व्यक्ति जितकी जितकी अप्रसिद्ध राहते तितकी तितकी तिची महती अधिक वाटावयास लागते पण सृष्टीचा धर्म असा आहे कीं तींत गुह्य-गोपन फार वेळ चालूं नये.

माझे रसिकमित्र आणि कवि श्रीयुत केशव महादेव सोनाळकर, वकील—जळगांव, यांनीं माझी विनंति मान्य करून या पुस्तकास मार्मिक प्रस्तावना लिहून दिली. हे त्यांचे मजवर आभार आहेत. प्रेमीजनांचें उतराई होतां येत नाहीं त्यांचें आभारी राहाण्यांतच मौज असते.

धनंजय प्रेसचे मालक श्री० दत्तोपंत सडेकर यांनीं मनोहर लीला काव्याबरोबरच नव्या टैपानें या पुस्तकाची छपाई करून दिली या विषयीं मी त्यांचे उपकार मानतों.

ता० २१।८।१९२०.

दु. आ. तिवारी,
मेहुणबारें.

वा।५८४०

# ‘ प्रसन्न राधा ’

( कथानक )

उन्हाळ्याच्या दिवसांतील ऐन बारा वाजण्यांची वेळ, तेव्हां ६।७वर्षांच्या मुलाला बरोबर घेऊन डोक्यावर गाठोडें ठेवून एक तरुण विधवा अनवाणी चालली होती. मुलगाही सकाळपासून अनवाणी चालून चालून थकून गेला आणि तो पाणी मागू लागला “पुढें येणाऱ्या नदी-पर्यंत कसातरी चल तेथें तुला थोडें खायाला घालतें व पाणीही देतें अशी ती मुलाची समजूत करीत होती. मुलानें शक्यतोंवर दम धरला शेवटीं एकाझाडाखालीं त्यानें आग टाकलें ! !

आईच ती! तिच्या तोंडचें पाणी पळालें बिचारी शिंकाळी तांब्या घेऊन कुठें जवळ विहीर असेल म्हणून शेतातून निघाली शेवटीं तिला नदीवरच यावें लागलें! पाणी घेऊन येते तों मुलगा नाहीं ! ती अत्यंत शोक करू लागली. तो ऐकून कुणी वनवासी तेथें आला व त्यानें इकडून कोणी सद्गृहस्थानें तो मुलगा जाता जाता गाडींत घालून नेल्याचें आपण पाहिलें म्हणून सांगितलें

या निराश्रित बाईचा नवरा अकस्मात वारला होता अंतसमयीं नवऱ्यानें **दामोदरपंत** नावाच्या आपल्या ज्या सन्मित्राकडे तिला जावयास सांगितलें होतें तोच तो मुलास नेणारा सद्‌गृहस्थ होता. त्याकडे मी तुला उद्यां गाडींतून पोंचवीन असें सांगून त्या वनवाशानें तिला आपल्या घरीं नेऊन तसें दुसऱ्या दिवशीं पोंचतें केलें.


दामोदरपंतास **राधा** नामें सुस्वरूप कन्या होती. या विधवेचा मुलगा जो **कृष्ण** त्याची व तिची लहानपणापासून मैत्री होती, पुढें ते परस्परांचे प्रणयी बनत चालले. दामोदरपंतास संतति नसल्यानें त्यांच्याही मनांतून **कृष्णाला राधा** द्यावी व मित्रऋणातून मुक्त व्हावें असें होतें पण ही गोष्ट राधेच्या आईस संमत नव्हती. तिचा दूरच्या नात्याचा कोणी भाऊ होता त्याच्या मसलतीनें तिनें त्याच्या माधव नामें मुलास राधा दिली

आशाभग्न असा कृष्ण विरागी झाला, तीर्थस्थानीं आयुष्य घालवावें ह्मणून तो निघाला जाता जातां त्यानें राधेची भेट घेतली तिनें त्यास पुष्कळ बोध केला पण तो व्यर्थ गेला पुढें कांहीं दिवस त्याच्या भेटी होत असत त्यावरून माधवास संशय आला बापामागें तो दुर्व्यसनी हलकट लोकांच्या नादीं लागला होता त्यानें एके दिवशीं अमलात मूर्खपणानें तिला घालविली. तिनें आता हें तोंड आई-बापास काय दाखवावें ह्मणून हरि-

द्वारचा मार्ग सुधारला  कृष्णा अगोदरच तिकडे निघून गेला होता

कंगाल बनल्यावर माधवाचे डोळे उघडले, कृष्णाच्या हातचें राधेस आलेलें पत्र तिच्या पेटींत त्याला सांपडलें. तें शुद्धप्रीतीचें पत्र वाचून त्याचा संशय दूरावला. अशा साध्वीचा छळ केला ह्मणून तोही तिला शोधण्यास तीर्थीं निघाला.

पुढें हरिद्वारास तिघाच्या मोठ्या मजेदार गाठी पडून ते परत येऊन संसारास लागले आहेत



सं. क्र. ५५०

# प्रसन्न-राधा.

चाल.—चंद्रकांत राजाची कन्या.

*    ( १ )    *

गगनविहारी सूर्य तळपतो दुपारची वेळा ॥
पक्ष्यांनीं घ्यावया विसावा वृक्षाश्रय केला ॥ १ ॥

धेनु वासरासवें बैसल्या खालीं छायेंत ।
मुलें गुराखी जवळ शिदोरी बसलीं सोडीत ॥ २ ॥

रुक्षमेदिनीकडे न बघवे शुष्क तिची काया ।
वावटळीचे लोट लाविती डोळे झांकाया ॥ ३ ॥

सुकलेला पाचोळा तैशीं गवताचीं पानें ।
धुरळ्यासह तीं पहात जाती झुडपाचीं रानें ॥ ४ ॥

ऐन दुपारीं कडक उन्हाळा, लहरी झळझळती ।
जलाभास होऊन त्यामुळे कुरंग ही पळती ॥ ५ ॥

ऐशावेळीं मार्गीं चाले अभागिनि कोणी ।
सहा सात वर्षांच्या अपुल्या मुलास घेवोनी ॥ ६ ॥

विवर्ण झालेली ती भासे मूर्तिमती धरणी ।
लक्ष जिचें लागलें दयाघन देवाच्या चरणीं ॥ ७ ॥

सरोवरांतिल नलिनी जैशी झंझावातानें ।
वहात जावी कुणीकडे पुष्पासह लाटेनें ॥ ८ ॥

... ग्रंथालय ... १८२८

शिखरासह कोसळून यावी शिलानिराधार ।
अध:पात होऊन जाहला प्रपंच नि:सार ।। ९ ।।

साधुजनांची मनोरमा सुंदर आश्रम हरिणी ।
केली दैवें दुष्ट तिच्या सौभाग्यावर करणी ।। १० ।।

सौंदर्याच्या तपोवनातिल ती प्रकृती रमणी ।
अनाथ अबला उघडी पडली झाली किंकरिणि ।।११।।

भालीं उठल्या घर्म-बिंदुच्या मोत्यासम ओळी ।
रक्त कुंकुमाच्या बिंदुविण शोभा पण गेली ।। १२ ।।

तप्त महीनें कोमल चरणाची झाली लाही ।
पुत्राच्या क्लेशात विसरली निजदु:खाला ही ।। १३ ।।

* ( २ ) *

" पाय पोळती, भूक लागली दे आई ' पाणी ' "
असें ह्मणोनी शिशु आणी तो डोळ्याला पाणी ।। १४ ।।

काय करिल ती जरी जाहलें हृदयाचें पाणी ।
ओझें घेउन चालत होती ती ही अनवाणी ।। १५ ।।

" झालें, बाळा ! फार न उरलें, नदी दिसे आता ।
चल थोडासा पुढें चिमकुल्या ! धर माझ्या हाता " १६ ।।

तेथे देइन तुला खावया वदली ती माता ।
आशेनें उत्साह येइना कोणाच्या चित्ता ? ।। १७ ।।

हरिणिचे तें पाडस थकलें परंतु चालून ।
धरणीवरतीं अंग टाकिलें छाया पाहून ।। १८ ।।

"आई गे ! ह्मण काहीं आता पाय न हा उचले ।
जीभ कोरडी झाली काटे तिजवर बघ आले ॥ १९ ॥
देशिल दे खाया केव्हा पण दे आधीं पाणी"
"उन्हाळ्यांत होईल उन्हाळा जीवाचा रानी" ॥ २० ॥
ढाळित अश्रु ती माडिवर त्या घेउन बसली ।
निरुपम मातेच्या हृदयाला उपमा ती कसली? ॥ २१ ॥
"कसे करू? बाई ! कां कोठें विहीरही नाहीं" ।
असें ह्मणत ती सबाष्पनयनें सभोवार पाही ॥ २२ ॥
गाठोडें सोडोनी ताब्याशिंकाळी काढी ।
पुन्हां तिचें मन तिला परंतु संशयांत पाडी ॥ २३ ॥
"जाऊं कैशी मी सोन्याला करून या दूर" ।
त्रस्त मनीं दुश्चिंत कल्पना करिती काहूर ॥ २४ ॥
दगडाचें मन करून उठली, वदली ईशातें ।
देवा ? नारायणा ! तुझ्यावर सोंपवून जातें ॥ २५ ॥
या अबलेच्या विश्वासाचा करू नको घात ।
आशेचा हा किरण एक मम तुजला ही ज्ञात" ॥ २६ ॥

* ( २ ) *

कुरवाळोनी ह्मणे सुताला "जरा धरी धीर ।
असेल सान्निध विहीर, घेउन येतें मी नीर" ॥ २७ ॥
वाट सोडुनी शेतांतूनी लगबग ती चाले ।
लक्ष नसे खालतीं निघालीं पायांची सालें ॥ २८ ॥

कंटक रुतती पद अडखळती चालत असतांना ।
विसरुन गेली होती अपुल्या देहाच्या भाना ॥ २९ ॥

पायांला बाधिलीं तोडुनी पळसाचीं पानें ।
करूं नये दुर्दशा कुणाची असली दैवानें ! ॥ ३० ॥

पायपिटी जाहली, तुडविलीं तीं सारीं रानें ।
मरुभूमीचा अनुभव आला फिरण्या फिरण्यानें ॥ ३१ ॥

निराश होउन आतां वळली नदीकडे जाया ।
येथवरी ते चालायाचे श्रम गेले वाया ॥ ३२ ॥

एव्हाशीं जाऊन नदीवर परतुनही येती ।
" **संकटकाळीं भ्रांत मनाला वक्रमार्ग सुचती** " ३३

डोळे गेले खोल, पातली मृत्युकळा वदनीं ।
वात्सल्याचें झळकत होतें दिव्य तेज नयनीं ॥ ३४ ॥

त्या तेजाच्या पुढें रवीचें तेज फिकें व्हावें ।
दृश्य जगावर त्यानें अपुलें प्रभुत्व मिरवावें ॥ ३५ ॥

पावित्र्याची निर्मळगंगा गंगेवर आली ।
शांतविण्याला तप्त तनूला वेळ न हो उरली ॥ ३६ ॥

" वेळ नसे तव गान ऐकण्या गे ! सरिते बाई ! ।
वायूच्या स्रोतासह येई ध्वनि आई ! आई ! " ॥ ३७ ॥

तो ऐकोनी कसेंसेंच या होतें हृदयात ।
' **कारुण्याच्या पुढें न रुचती संगीतालाप** ' ॥ ३८ ॥

काय करूं हा वायु नेइना उडउन मज तेथें ।

असती किंवा पख तरी मी उडूनही जाते ॥ ३९ ॥
" सांग समिरा ! पुढे जाउनी 'आल्यें. मी आल्यें'।
दीन जनांना साह्य शाहणे करीत बा ! आले" ।४०।

* ( ४ ) *

विस्फारित नयनाने पाहत कनकाची पुतळी ।
चुंबकशक्तीनें आली झणिं तेथे वृक्षतळीं ॥ ४१ ॥
धस्स् जाहलें ! बाळ दिसेना छाती धडधडली ।
जागा तर चुकली नाहीं ना ? दृष्टी बावरली ॥ ४२ ॥
जवळ कुठें तर नसेल गेला उठून चालून ।
' कृष्णा बाळा ! ' हाकहि नुमटे कंठहि दाटून ॥४३॥
तिजवर होई हा दुःखाचा नवीन आघात ।
धाय मोकलुनि ' हाय ! ' ह्मणाली झाला हो ! घात ४४
दीन दयाळा ! तुला विनवुनी गेल्यें होत्यें ना ? ।
विनतिचा मम अर्थ तुला तो कळला होता ना? ।४५।
सांग कुठे नेऊन ठेविला विधवेचा ठेवा ।
त्याच्या साठीं मरून होइन पिशाचिणी देवा ! ॥४६॥
तुझ्या कृपेचे पाट वाहती सौख्याच्या वाटे ।
माझ्या मार्गीं कसे पसरिशी दुःखाचे काटे ॥ ४७ ॥
उदार चरिता ! दया सागरा ! दया कशी ना ये ।
निष्फल तुजला गमतें कैसें अरण्यरोदन हें ॥ ४८ ॥
कुठे कुमारा ! पाहू आतां तनु माझी भागे ।

कुठे निघोनी जाशी बाळा ! तूं माझ्यामागें ? ॥ ४९ ॥
शक्तिहि नव्हती उठावयाची मग कोठें जाशी ।
वन्यपशूंनीं तर नाहींना मुकला जीवाशीं ? ॥ ५० ॥

यावांचोनी दुजी कल्पना मज नाहीं होत ।
दुष्ट चिंतणाऱ्या हृदयाचे तुकडे होवोत ॥ ५१ ॥
" आई ! आई ! " म्हणून तव ती किंकाळी आली ।
काय दैवगति कुणी नसावा जीवाचा वाली ॥ ५२ ॥
तुझ्या सुखास्तव मी दुःखाच्या काट्यावर निजलें ! ।
वैधव्याचें प्राशोनी विष तुजसाठीं जगल्यें ॥ ५३ ॥

* ( ५ ) *

" नुकते गेले नाथ सोडुनी त्यांच्या दुःखाचे ।
नसती अजुनी अश्रु वाळले या मम नयनाचे ॥ ५४ ॥
एका घावासरसी झाली जी अर्धी मेली ।
दुजा घाव घालून दूर ती जगातुनी केली ॥ ५५ ॥
दुर्गतिच्या कूपात ढकलली जगली कीं मेली ।
शिळा घालुनी वरून तनुची शिळा तिची केली ।५६।
दु खानें गांजली, पोळली विरहानें असली ।
तिच्या गळ्याला नख देण्याची निर्घृणता कसली ५७
निरुत्साह जीवित प्रदेशी होता एक झरा ।
तोहि आटतां मत्सी कैशी जगेल तेथ जरा ॥ ५८ ॥
अतां कुणावर भार टाकुनी जगांत या राहूं ? ।

हात धुउन पाठीस लागला दैवाचा राहू ! ॥ ५९ ॥

एक नेत्र या लोकीं होता, परलोकीं दुसरा ।
अंध जाहलें सर्व सुखानों आता दूर सरा ॥ ६० ॥

विपद्ग्रस्त विह्वळ विधवेच्या विलापवीणेनें ।
विटपविहारी विहग विसरती विलासविज्ञानें ॥ ६१ ॥

मोहपरायण हृदयविदारीं शोकाचीं गीतें ।
ऐकुन आला वनवासी कुणि कळवळुनी तेथें ॥ ६२ ॥

कथा ऐकुनी दुश्चरिताची हळहळला भारी ।
ह्मणेः—' नको वाहूंगे ! भगिनी अश्रूंच्या हारी ॥ ६३ ॥

ज्याला तूं मृत समजुन रडसी जिवत तो आहे ।
दुःखाचा हा भार शिरीं तूं कशास गे ! साहे ? ॥ ६४ ॥

पुण्यात्म्यानें कोणीं तो मी नेलेला ऐकिला ।
फार वेळ नाहींगे ! झाला तास एक गेला ॥ ६५ ॥

कोस दोन कोसाच्या पुढतीं नसेल तो गेला ।
नको उतावळि होऊ पुढच्या ऐक योजनेला ॥ ६६ ॥

तूं धर्माची भगिनी माझी तोंडानें वदलों ।
साह्य न केलें कांहीं तर मग कर्तव्याचुकलों ॥ ६७ ॥

सकाळची चालता चालता थकून गेलीस ।
एका घासालाही बाई ! नाहीं शिवलीस ॥ ६८ ॥

घरीं येउनी गोड करी मम भाकर चटणीस ।
गंगाभागिरथीनें पावो गृह पावनतेस ॥ ६९ ॥

तुझ्या पदाच्या रज.कणांनीं द्वार देहलीस ।
पवित्रता आणून दाखवी बंधु प्रेमास ।। ७० ।।
एक रात्र जाईल निघोनी गृहिणीसह माझ्या ।
अनेक रात्रीं आठवणी येतील तिला तुझ्या ।। ७१ ।।
कांताच्या मित्राचें जें तूं नांव बोललीस ।
संकटकाळीं आश्रयार्थ ज्याकडे निघालीस ।। ७२ ।।
धर्मात्मा तो त्याच गावचा असेल हा तर्क ।
होउ नये गे! तुझ्या मनाला चिंता-सपर्क ।। ७३ ।।
पोंचवीन नेऊन सकाळीं गाडी घेऊन ।
कशास आगीमधें उडी घेसी वेडावून! ।। ७४ ।।

* ( ७ ) *

चातक अत्यानदें प्राशी एक एक बिंदू ।
सुतशुभवार्ता श्रवून भरला मोदाचा सिंधु ।। ७५ ।।
बर्फ वितळुनी उन्हाळ्यात भागिरथी शोभावी ।
ग्रहण सुटोनी रजनीला कीं प्रसन्नता यावी ।। ७६ ।।
गाढ तिमिरी प्रकाश पडुनी कांती विलसावी ।
स्मशानभूची रंगभूमिका अकस्मात व्हावी ।। ७७ ।।
ठेव ठिकाणी आहे कळता कृपणस्थिति व्हावी ।
दुष्ट करांतिल गळून मत्सी जलात पोहावी ।। ७८ ।।
झाली तैसी प्रसन्न, हृदयीं आनंद न माय ।
हाल अपेष्टा दुःखें सारीं विसरुन ती जाय ।। ७९ ।।

उच्च भावना उदात्त हेतु पवित्र ती नीती ।
ऐकुन झाली रोमांचित तनु प्रगल्भ वाणी ती ॥ ८० ॥
दुसऱ्याच्या दुःखाशीं ज्याचे दुःखाश्रू मिळती ।
त्याच्या हृदयीं सहानुभूती करितसे वसती ॥ ८१ ॥
आत्मसुखाचा यज्ञ करूनी भूतदया साधी ।
मोक्षसुखाच्या सोपानावर तो चढतो आधीं ॥ ८२ ॥
निजदेहाला तुच्छ मानुनी उपकारीं झटणें ।
कठीण आहे स्वर्गाचें भूवरतीं अवतरणें ॥ ८३ ॥
जातीचा तो असो कुणीही वद्यच होईल ।
नको तयाला जाणें कीर्ति चालत येईल ॥ ८४ ॥
पुष्प सुवासाकडे न जाई वास तिथें राही ॥
गोडीसाठीं साखर कोठें भटकत का जाई ? ॥ ८५ ॥
तसे मूळचे सज्जन त्याना यश शोधित येतें ।
यशोद्भवाचें किंबहुना तें स्थानच कीं होतें ॥ ८६ ॥
अंध होउनी गतानुगतिकत्वाला ना वरिती ।
परमार्थाच्या स्वतंत्र मार्गी डंका वाजविती ॥ ८७ ॥
अशा थोर नररत्नांनी ही धन्य मही होते ।
देवभूमिची तिला साम्यता कांहींशी येते ॥ ८८ ॥

※ ( ८ ) ※

वदे श्रद्धावति मानव नसशी देवदूत असशी ।
पुत्राच्या वार्तेची मातें सुधा दिली ऐशी ॥ ८९ ॥

प्राप्य न जें सुख वाटे त्याचा अनुभव तूं दिधला ।
तुजवरुनी ओंवाळुन टाकूं का या देहाला ? ॥ ९० ॥
स्वजनोपेक्षेनें जी नाहीं अनुरागीं पात्र ।
आत्मीय प्रेमानें धरिशी तिच्यावरी छत्र ॥ ९१ ॥
बहीण ह्मणुनी संकटकाळीं जो ये धावोनी ।
गेलेला उतरला बंधु तो तू स्वर्गाहूनी ॥ ९२ ॥
माझा हा मी भार तुझ्या बा! खांद्यावर ठेवी ।
तुझी उपकृती माझ्यावरची फेडू पण केंवी ॥ ९३ ॥
वदे-हंसोनी-" बाई! तुज का कौतुक वाटावें ? ।
माणुसकीचें ब्रीद असावें माणसास ठावें ॥ ९४ ॥
असो ऊठ चल जसें हळूहळु चालवेल तुजला ।
दिवस ढळाला डोक्यावरचा ताप कमी झाला ॥ ९५ ॥
चूळ भरुन टाकली घोंटभर पाणीही प्याली ।
तोंड पुसोनी उभी राहिली 'चल भाऊ'! वदली ॥ ९६ ॥

* ( ९ ) *

सभोंवतालीं वृक्षलताचीं शोभा बिनमोल ।
कुंजाकुंजातूनी गाती मयूर चंडोल ॥ ९७ ॥
उघडे कोठें शिलाखड वाळूचीं मैदानें ।
निसर्गदेवीच्या क्रीडेचीं जीं रम्यस्थानें ॥ ९८ ॥
तरंगिणी हिरव्या झाडीच्या बुरख्यातुनि चाले ।
मंद समीरें इकडुन तिकडे पदर तिचा हाले ॥ ९९ ॥

तटतरुवासी विहग कलध्वनि करिती आनंदें ।
हिरवळींतुनी हरिण बालकें फिरती स्वछंदें ॥ १०० ॥

अशा मनोरम त्या तटिनीच्या काठीं गांवात ।
राहे 'दामोदर' नावाचा दीनांचा नाथ ॥ १०१ ॥

लोकप्रिय गावचा पुढारी श्रीमतहि मोठा ।
कोणाला पण नाहीं केव्हा दाखविला ताठा ॥१०२॥

त्यावाचोनी गावामध्यें पानहि ना हाले ।
न्यायनिवाडे कितीक त्याच्या हातानें झाले ॥१०३॥

त्याला 'राधा' नामे होती कन्या नवसाची ।
विश्वनियत्याची जी वाटे प्रथम कृती साची ॥१०४॥

कुबेर कोशांतील हिरकणी तारा स्वर्गाची ।
निर्मल धारावलि कीं भाग्याच्या पर्जन्याची ॥१०५॥

कांचन गंगा लाजविणारी हिमधवलांगाची ।
यक्षकुमारी किन्नर बाला की गंधर्वांची ॥ १०६ ॥

कळी मल्लिकेची किंवा मंजिरि मंदाराची ।
देवांच्या कानावर शोभा जिची खुलायाची ॥१०७॥

अप्सरसा कुणि आली कन्या टाकुनि ती गेली ।
धर्मात्म्यानें ती का सदनीं अपुल्या वाढविली ।१०८।

बापाचे जे अनेक सद्गुण पुतळी की त्यांची ।
व्यंग न कांही मूस ओतिली अवयव रूपाची ।१०९।

**सुरूप सुमती सुता सुजनका सुखवी सुगुणानें ।**
**सुरेख सुंदर सुम सुखवीतें जसें सुगंधानें ।११०।**

गोड बोलणें गोड पाहणे हसणें तर गोड ।
कितीक वाटे बापाला कीं पुरवावे कोड ॥ १११ ॥
बालगुणांनीं मोहुन टाकी हसवी सगळ्यांना ।
मुके सारखे घेतां यावी लाली गालांना ॥ ११२ ॥
कटाळा येवो कीं वाटो त्रासहि कामाचा ।
तिला पाहतां शीण मनाचा हरून जायाचा ॥११३॥
रोज एकटी मनास रिझवी गाऊनी गाणे ।
खेळगडी तिज आज लाभला होता दैवानें ॥ ११४ ॥
बालचंद्रिका बालचकोर प्रांगणभागात ।
खेळत होतीं जनकचंद्र तो बसला पाहात. ॥ ११५ ॥
त्याच्या विलसे शांत मुखावर चिंतेचा डाग ।
निरखित होता मधून मार्गाकडे महाभाग ॥ ११६ ॥
आकुंचित विस्फरित दृष्टी पुनः पुन्हां व्हावी ।
क्षणांत त्याच्या भ्रुकुटीची ती कमान वर जावी ११७
कोणाला तो बघत असावा चिंता ही कसली ।
परिजन–वेष्टित दुरून गाडी आलेली दिसली ।११८।
समाधान वाटलें वदे–" शोधाला फळ आलें" ।
हाक मारुनी गृहिणीला दाराशीं बोलविलें ॥ ११९ ॥
उभी राहिली गाडी, उतरे मनोरमा खालीं ।
दोन मुलें दाराशीं दिसली उभी राहिलेली ॥ १२० ॥
' आई ' ह्मणुनी पडला कृष्णाचा पायी विळखा ।
कुरवाळोनी उचलुन, घेई कटिवर एक मुका ॥१२१॥

चुकलेल्या वासरास भेटे अकस्मात गाय ।
हर्ष पुसावा मातेच्याही हृदयाचा काय? ॥ १२२ ॥

अधाची यष्टी किंवा ती कृपणाची ठेव ।
शुद्ध मतीला प्राप्त खरोखर होय कृष्णदेव ॥ १२३ ॥

कोहिनूर हरवला गळ्याचा दैवें सापडला ।
शुष्क जाहल्या द्राक्षलतेला अंकुर कीं फुटला ।१२४।

तो देखावा पाहुन बिंदू सगळ्याना आले ।
**कोण असे कीं कारुण्यानें विकल न जे झाले ।१२५।**

" घरांत बाई ! चला " ह्मणाली गृहलक्ष्मी तीतें ।
प्रवेशिली ती उषेमागुनी जणू संध्या तेथें! ॥ १२६ ॥

तिच्या लोचनीं आनंदाचे जे अश्रू भरले ।
क्षणात त्याचें दुःखामध्यें रूपांतर झालें ॥ १२७ ॥

दामोदरपंतास पाहता आले भडभडुनी ।
पतिशोकाची सरिता वाहे नेत्रीं खळखळुनी ॥१२८॥

ह्मणे–" नाथ ! जातांना मजला ज्यांवर सोंपविलें ।
प्राण जयांच्या भेटीवांचून लवकर ना गेले ॥१२९ ॥

जीव घाबरा झाला तरिही ' दामोदर ' वदले ।
मनांत होतें सांगायाचें काय न तें नकळें ॥ १३० ॥

' काय ' ह्मणूनी पुसतां इकडे बोट दाखवीलें ।
कोणासाठीं कुणास ठावें अश्रु दोन गळले ॥ १३१ ॥

त्याच्या गेहीं आलें तुमची आज्ञा अनुसरुनी ।
नाहीं आप्तस्वकीय गेलां अनाथ मज करुनी" ।१३२।

"पुरे पुरे कर मनोरमे ! तू कितीक रडशील ! ।
गेला स्वर्गी राजहंस का परतुन येईल ? ॥ १३३ ॥

अकस्मात् हा झाला कैसा घात न मज कळला ।
कालपासुनी पोहत होतों. संशय जलधीला ॥१३४॥

एक जिवाचा जिवलग होता काळानें हरिला ।
मला सोडुनी बंधू माझा एकटाच गेला ॥ १३५ ॥

अंतकाळच्या हांकेला ना दिधला होकारा ।
आता बसलो उगीच ढाळित अश्रूंच्या धारा ॥१३६॥

प्राण सोडताना प्रेमाचा विसर न मम पडला ।
पाळिन त्याच्या वचनाला हा देह जरी पडला १३७

माझ्यासाठीं ज्याच्या स्रवले नेत्राचे बिंदू ।
आटवीन त्याच्या बाळास्तव रक्ताचे बिंदू" ॥१३८॥

पुसून डोळे ह्मणे–' नको चिंता पुढची वाहूं ।
तुला न वाटो घर परक्याचें कसें इथे राहू ? ॥१३९॥

एक कुटुंबी एक भावना सर्वांची असता ।
प्रीतिलेख येती ना त्याच्या हृदयाचे पुसतां ॥ १४० ॥

मी माझा मानिला स्वताचा सुत कृष्णा स्वमनीं ।
यापेक्षा तुज अधिक काय मी सांगू गे ! वहिनी १४१

काल दुपारीं झाडा खालीं निचेष्ट मज दिसला ।
ओळख पटतां खरें सांगतों मज चटका बसला १४२

कार्यकारणाचा तैं केला विचार बहु खोल ।
तर्कवितर्कांचे उठले या मनात कल्लोळ ॥ १४३ ॥

तूहि असावी सर्व वाटलें निःसशय माते ।
कशी सोडुनी राहिल माता अजाण बालातें ॥१४४॥

परतु नव्हता वेळ मला दुःस्थिति याची बघतां ।
प्रयास मोठे पडले सावध नदीवरी करिता ॥ १४५ ॥

आज सकाळी पुष्कळ याला विचारल्या गोष्टी ।
जुळली नाहीं एक साखळी झाले मन कष्टी ॥१४६॥

गडी माणसे शोधायाला होतीं पाठविलीं ।
पोंचविण्या तूज आली पण ही व्यक्ती कोण भली?" १४७

त्या अबलेनें वृत्त आपलें सगळें सांगितले ।
त्या बंधूच्या कृतज्ञतेला आविष्कृत केलें ॥ १४८ ॥

दामोदरपताना आदर का ना वाटावा ।
असंस्कृतानाहि संस्कृतिपरिणय दिसून कीं यावा १४९

" या हो! पाटिल, बसा ह्मणाले जेउन जा आता" ।
"राव ऊन होईल ह्मणाला मज जाता जातां"॥१५०

" असो न्यहारी विना न जाऊ देइन मी तुह्मां ।
बाईला पोंचवून केले उपकारी आह्मा " ॥ १५१ ॥

बैलाना गाडीस बाधुनी चारा तो सारी ।
शेतकऱ्यांची मदार असते गुरांवरी सारी ॥ १५२ ॥

तोंड धुवूनी बसला पानावर कुणबी भाई ।
झाली होती घरास ज्याला जाण्याची घाई ॥ १५३ ॥

करुन न्यहारी परतुन जातां पुसावया येई ।
" स्मरण असूदे गरीब भावाचें येतों बाई " ।१५४।

गद्‌गद कंठें तयां ह्मणाली–" हे ! बंधूराया ! ।
विसरू कैशी तुवा लाविली जी मातें माया ॥१५५॥
भेटत जा येऊन कधी मज आला तर येथें ।
तुजविषयींचें प्रेम मुखें ना बोलाया येतें " ॥ १५६ ॥
" आठा दिवशी येतच असतों येथें बाजारीं ।
भेटीवाचुन जाइल कैशी माझी ती फेरी " ॥ १५७ ॥
दामोदरपताना मुजरा करून तो उठला ।
राधाकृष्णाशीं बोलोनी गाडीवर बसला ॥ १५८ ॥
बघता बघता दूर निघोनी गाडी ती जाई ।
एक दोनदां मुख फिरवुनी मागे तो पाही ॥ १५९ ॥
दृष्टि आड झाली गाडी पण पाहत ती राही ।
भरली प्रतिमधें निराळी जादू हो काही ॥ १६० ॥

* ( १० ) *

महापूर दु:खाच्या सरितेचा काहीं शमला ।
गेले कांही दिवस, मनाचा संकोचाहि गेला ॥१६१॥
राधेची तर कृष्णासह मैत्री मोठी जुळली ।
नवीन खेळामधें रोजच्या जोडी ती गढली ॥१६२॥
त्यावांचोनी तिजला किंवा तिजवांचुन त्याला ।
करमत नव्हतें लुब्ध मनाच्या नलिनी भृंगाला ।१६३।
जेथें राधा कृष्ण तिथें कृष्णाहि राधास्थानीं ।
राधाकृष्णाचें गृह गोकुळ ह्मटलें लोकांनीं ॥ १६४ ॥

कृष्णानें गावें राधेनें मोहित तें व्हावें ।
त्याच्या तोंडाकडे कौतुकें पहात बैसावें ॥ १६५ ॥

बोलविणें राधेला तर तो हांक न तिज मारी ।
कर्णविहारी कंठबांसरी वाजवि सुखकारी ॥ १६६ ॥

कानीं पडतां त्याच्या मधुगानाची ललकारी ।
राधा हांसत धांवत येई घरांतुनी दारी ॥ १६७ ॥

कुरळ केस उडणारे काळे डोळे हसणारे ।
पाहो कोणी पाहतांच त्या मोह पाडणारे ॥ १६८ ॥

झगझगणारे तेज बुद्धि आकर्षण करणारे ।
दिपून जाती ज्यास सर्वही लोक पाहणारे ॥१६९॥

पुष्पमालिनी गंधशालिनी मृणालिनी राधा ।
कृष्ण मनाला नितांत लावी प्रेमाची बाधा ॥१७०॥

सौंदर्यानें बालरवीच्या तेजाला फिरवी ।
शुभ्रसुमांचा नवा बगीचा हास्यानें उभवी ॥१७१॥

गालावरच्या रंगछटांनीं उष.प्रभा सारी ।
तनूस दिधली शुभ्र कौमुदी किरण पुढें भारी ॥१७२॥

अशी मूर्ति ती पहात यानें गायन विसरावें ।
लटक्या रागानें राधेनें रुसून बैसावें ॥ १७३ ॥

"बोलत कां नाहीस? एकदां हास गडे! हांस ।
रुसशी कां तें पूर्वीचें गाणें ऐकायास ॥ १७४ ॥

त्याच्यापेक्षां सुंदर म्हणतों तुजसाठीं दुसरें ।
राधे! आधी एक वेळ पण तोंड करी हंसरें ॥१७५॥

खळी कपोली तिच्या पडावी हास्याची सहजी ।
बालगड्यावर बालमैत्रीणीची मोठी मर्जी ॥१७६॥

"मला गधा! गे कलेवली दा मी नाई तूझी" ।
असें बोलता त्यानें घ्यावी उचलोनी सहजी ॥१७७॥

**राधाहर राजस राधेला राजी राखी तो ।**
**राजहंस राजीवांच्या राजीला राजवितो ॥१७८**

सर्वांना तें त्यांचे मोठें कौतुक वाटावें ।
"छान शोभतो जोडा हा" पतानीं बोलावे ॥१७९॥

"आवडते का तुला बायको ही कृष्णा कांहीं ।
विनोद करितां ठेवुन खाली पळून तो जाई ॥१८०॥

"दाहो बाबा काय बोलतां गेलाना पलुनी" ॥
असें ह्मणोनी दुडदुड मागें जाई ती फिरुनी ॥१८१॥

दिवस न जाई विनोद काही केल्यावाचून ।
रुचत नसावा राधेच्या मातेला आंतून ॥१८२॥

खेळत असतां राधा लावी लग्न बाहुलीचें ।
कृष्णभट तैं सूर काढिती मंगलवाणीचे ॥१८३॥

केव्हा होई नवरदेव तो नवरी ती होई ।
हांसत मुरकत पदर सांवरित लाजोनी पाही ॥१८४॥

निघतां तो शाळेस उभी ती जाण्याच्या वाटे ।
त्यालाही तिज वाचुन आपण जाउ नये वाटे ॥१८५॥

शिकवावें तिज कांहीं त्यानें जवळी बसवोनी ।
गुरुशिष्यीचें नातें जाई मनात विसरूनी ॥ १८६ ॥

क्र. ९६२८ ग्रंथ

पुसे तिला आवडे एक कां आवडती दोन ।
एक आवडे सोबती मज बोले हासोन ॥ १८७ ॥

* ( ११ ) *

बालपणाचा काळ सुखाचा गेला सपून ।
नाहीं केव्हां येणारा जो गेला उलटून ॥ १८८ ॥

यौवनांगणी बाल्याच्या दारातुन ते आले ।
होउं लागलें प्रेमाचें रूपांतर ना कळलें ॥ १८९ ॥

शुद्ध प्रेमाच्या लहरीचा ओघ न तो फिरला ।
लज्जेचा पण एक जीर्ण पट मधें उभा झाला ॥१९०॥

वाढत गेली कलावतीच्या शोभा वदनाची ।
एक एक पाकळी विकसली गुलाब कलिकेची ।१९१।

तारुण्याच्या वसंतकाळाची छाया फिरली ।
देहलतेची तिची रम्यता खुललेली दिसली ॥ १९२ ॥

कृष्णमनाचा भ्रमर तिनें केला अगदी वेडा ।
नवीन जैसा पळत सुटावा कीं अरबी घोडा ॥१९३॥

परस्पराशीं दोघे वदतांना होई काय ।
स्तब्ध राहुनी दृष्टीचें मीलन होउन जाय ॥ १९४ ॥

एकच हेतू दोघांचा कां बोलाया भीती ।
गूढ भावना परस्परांपासूनी लपवीती ॥ १९५ ॥

पवित्रता असल्यावर पडदा उघडा दावावा ।
जपती दोघे प्रणयाचा कीं अपमान न व्हावा ।१९६।

राधा तर बोलणार नव्हती मुग्धा जातीची ।
कमान होती चढत सुंदरी इंद्रधनुष्याची ॥ १९७ ॥
काय ह्मणावें कसें ह्मणावें सुचे न कृष्णाला ।
फिरवित होतें विचारचक्रें मन त्याचें त्याला ॥१९८॥

* ( १२ ) *

वर्षा गेली शरदृतूचा येई काळ पुढें ।
लेणीं लेवुन तारुण्यानें सृष्टिसती मुरडे ॥ १९९ ॥
उभ्या पिकांनीं शेतें भरलीं वाऱ्यांनीं डुलती ।
शेतकऱ्याची दिसून येई रानीं गजबजती ॥ २०० ॥
तरंगिणीचा प्रवाह चाले खळखळ वाहात ।
स्वस्थ बसावें काठीं तिजला कितीक पाहात ॥२०१॥
हिरवी छाया काठावरची हाले वृक्षाची ।
प्रवाह-चंचल-जलीं तयाची शोभा बघण्याची ॥२०२॥
लहान मासे थवे करूनी वरखालीं येती ।
जणों चमकते नील नभीं नक्षत्राची ज्योती ॥२०३॥
धुणें धुवाया राधा तेथें ये एके दिवशीं ।
शारदलक्ष्मी भेटाया कीं आली सरितेशीं ॥२०४॥
कदंबास वेष्टुनी चमेली झाली जी जाळी ।
निर्मळ हातानें वस्त्राचा मळ तेथें क्षाळी ॥२०५॥
शुभ्रकपोलीं तिच्या वरोनी शुभ्र फुलें पडलीं ।
शुभ्र उरीं अडखळुनी कांहीं शुभ्रजलीं गळलीं ॥२०६॥

वेल हालुनी वाऱ्यानें हीं गळलीं असतील ।
तिरीप लागुन कडक उन्हाची सुकून जातील ॥२०७॥

चंचल जीवित फुकट वाहुनी गेल्या कुसुमांचें ।
"फुकट असे सत्कार्यां वाचुनि आयु मनुष्याचें" ॥२०८॥

वेंचुन घेई सभोंवतालीं पडलेलीं ओटीं ।
ह्मणे "हार मी करीन यांचा कृष्णाच्यासाठीं" ॥२०९॥

पुन्हां पुंज ये वऱ्याच पुष्पांचा वरुनी एक ।
वेणीवर पदरावर खालीं पडलीं कित्येक ॥ २१० ॥

नीलकांतिचे किरण फेंकिले वर अभिरामेनें ।
'कोण विंधितो कुसुमचाप हा मज निर्दयतेनें' २११

कोण दुष्ट तूं? छे! बाई मम आवडता स्नेही ।
केव्हाशीं आलास मला का सांगितलें नाहीं" ।२१२।

काहीं भीती कांहीं शंका पाहत पण राही ।
धुणें राहिलें त्याची तिजला शुद्धीही नाहीं ॥२१३॥

"कृष्णा! वरती बघतां येई गळावया मान ।
उतरुन ये जवळी दे माझ्या वचनाला मान" ।२१४।

आला जवळी कृष्णा, क्षणभर दोघें ना वदलीं ।
तोच ह्मणाला—"राधे! पुष्पें कशास हीं वरिलीं? २१५

"माझ्यावर उधळिलीं जयानें त्यावर उधळाया ।
कांहींचा तो हार करूनी गळ्यांत घालाया" ।२१६।

"तुझ्या कराचा हार राधिके! गळ्यांत घालाया ।
सांग खरी भाग्याची आहे मदीय कां काया ॥२१७॥

शुद्ध प्रीतिमय पुष्पांच्या त्वदीय या हारीं ।
करिशिल कां मज बद्ध सर्वथा भावी संसारीं? ।२१८।

माझ्या भवसिंधूची नौका राधे ! तूं व्हावी ।
दर्या–सारंगाची कार्य-क्षमता मज यावी ॥ २१९ ॥

लाट थडकली वरीं उसळली भिडली गगनाला ।
कर्णधार मी तुझ्या जिवावर जाइन तीराला ॥२२०॥

तू स्वर्ललना माझी होतां चित्रसेन काय ।
शक्रालाही म्हणावया लावीन सत्य हाय ! ॥ २२१ ॥

शांत निकेतन हृदय विलोभन जीवित सुखसार ।
माझ्या सर्वस्वाला देवी तुझाच आधार ॥ २२२ ॥

हृदय मधुर बांसरी जरी कृष्णाची होशील ।
राधे ! सदनाला कुंजाची शोभा येईल ॥ २२३ ॥

मनोवृत्तिच्या गाई साऱ्या प्रसन्न होतील ।
संसाराचें प्रेक्षणीय या नजवन होईल ॥ २२४ ॥

उज्वल सिंहासनीं जिथें तूं बसशी हृदयाच्या ।
अप्सरसेचा दिमाख तेथें ना चालायाचा ॥ २२५ ॥

प्रीतिभावनांच्या काव्याचा केला समवाय ।
तुजविषयींच्या भाविसुखाशीं साम्यता न होय ।२२६।

बीज लावुनी बाल्यापासूनी जी वाढविली ।
प्रीतिलता ती परिणत व्हावी यौवन मधुकालीं २२७

लता चमेली कदंब होते लहान या कांठीं ।
पुन्हा एकदां पहा तयांची शोभा ही मोठी ॥२२८॥

कदंब हाले लतिका डोले बोले ती काय ।
करूं नको राधे ! जन्माची चूक न तूं हाय !" २२९

होती लाजत खालीं पाहत खेळत पदराशीं ।
धैर्य न होई बघावया तिज त्याच्या वदनाशीं ।२३०।

ह्मणे–" कमलिनी हस सोडुनी सेवी कोणाला ।
पयोधराच्या जवळी राहे तेजाची चपला ॥ २३१ ॥

सूर्य उषा वा चंद्र कुमुदिनी वसंत कोकीला ।
सागरसरिता याच्या प्रेमीं शङ्का कोणाला ? ॥२३२॥

परि उभयतांच्या प्रीतीमधुनी वडिलाची प्रीती ।
राहे जैशी त्रिपुंड्र गंधामधली रेषा ती ॥ २३३ ॥

वडिल जनांची मनोभूमिका आर्यावर्ताची ।
प्रक्षालूनी गाठ पडावी गंगायमुनांची " ॥ २३४ ॥

* ( १३ ) *

झाली ज्याची उपवर दुहिता चैन नसे त्याला ।
पण न्हती काळजी तशी दामोदरपंतांला ॥ २३५ ॥

सर्व गोष्टि अनकूल असूनी पुत्रच पण न्हता ।
**" सर्व सुखी येईना कोणी जगांत या बघतां "** २३६

उपोषणें व्रत केलें तैशीं जपदानें दिधलीं ।
**" दैवानें लिहिलेली रेषा नाहीं हो ! फिरली "** २३७

जुनें घराणें गर्भश्रीमतीचें तें होतें ।
वंशदीप त्या स्थळीं नसावा विधि चुकला येथें २३८

गेली पन्नाशी उलटोनी आशा मावळली ।
पंतांनीं योजना निराळी मनामधें केली ॥ २३९ ॥

मित्राच्या प्रेमाचा आहे डोईवर भार ।
माझ्या मागें कृष्णाला कोणाचा आधार ॥ २४० ॥

हुशार आहे कुलशीलाचा गरीब बापाचा ।
रोहिणिला शोभतो सुधाकर पूर्णावस्थेचा ॥ २४१ ॥

कन्यादानीं अर्धी लक्ष्मी राधेला द्यावी ।
करिता येइल अर्धीचें मग दत्तपत्र भावी ॥ २४२ ॥

बुद्धी ज्यांची खोल दूरचा विचार करणारी ।
त्याच्याही का मार्गीं गर्ता मोह पाडणारी ॥ २४३ ॥

विचार त्यांनीं एके दिवशीं पत्नीला कथिला ।
संबधीं कुणि बंधू होता घात तयें केला. ॥ २४४ ॥

ह्मणे " गुणाची माझी बाळा आहे रूपाची ।
भलत्याच्या पदराशीं नाहीं बांधूं द्यायाची ॥ २४५ ॥

असेल कोकिळ गाणारा का हंसी त्या देता ? ।
पितळेच्या कोंदणांत कैशी हिरकणि बसवीतां ! २४६

कशी ओंवता सुतात पुतळी जनता हांसेल ।
बाभूळावर कशी चढवितां जाईची वेल ॥ २४७ ॥

गोड गुणाचा असला मोठा हुशार डोक्याचा ।
मला जांवई नको असा उदरंभर वृत्तीचा ॥ २४८ ॥

दादाचा माधव राधेला आहे अनुरूप ।
बघत रहावें उभें राहुनी त्याचें वयरूप ॥ २४९ ॥

रामजानकीचा तो जोडा सुंदर शोभेल ।
प्रेमाच्या जाळींत न माझें सुम कोमेजेल ॥ २५० ॥
लग्नाचे पाहून सोहळे डोळे निवतील ।
पोटीं नाहीं कांही कीं हे प्रसंग येतील " ॥ २५१ ॥

* ( १४ ) *

होता ठावा तिचा तयांना स्वभाव उन्माद ।
हालविली घंटा तर घरभर घुमेल कीं नाद ॥ २५२ ॥
त्यांस वाटलें समजूतीनें वळविन मी हिजला ।
" विकारवशता गेल्यावर शिंपावें बोधजला " २५३
दगडाच्या बुद्धीवर बसले बोधाचे धक्के ।
वेताळानें भूत भारिलें होतें तें पक्कें ॥ २५४ ॥
गृहकलहापर्यंत मजल त्या आली विषयाची ।
राधा कृष्णाच्या दैवाची परीक्षाच साची ! ॥ २५५ ॥
मनोरमेला कोडे पडले कैसें बोलावें ।
" कांठ सोडुनी दुबळ्यानें कां मध्यें पोहावें " २५६
दोघांच्या भांडणांत तिसरा अधिकारीच हवा ।
अधिकाऱ्यांतील भांडण जनचर्येचा विषय नवा २५७
बाजु सोडिली रागरंग पाहोनी रावांनीं ।
गृहच्छिद्र पाहून हसावें कीं ना लोकांनीं ? ॥२५८॥
कृष्णाचें कल्याण करायाचे तर होईल ।
कोण कोठवर कोणाच्या दैवाला अडवील २५९ ॥

* ( १५ ) *

मार्गशीर्ष मासातच त्यांचा तिथि निश्चय झाला ।
दहा हजारांचा वर पक्षाचा हुंडा ठरला ॥२६०॥
द्रव्याचे उघडले खजीने वधुवर पक्षाचे ।
दिपून गेले डोळे त्या गावाच्या लोकांचे ॥२६१॥
श्रीमंतीच्या थाटाचे झाले सुखसोहाळे ।
वाजंत्र्यांच्या ध्वनींत लग्नाचें मंगल झालें ! ॥२६२॥
राधेचा माधव हा झाला जन्माचा स्नेही ।
गेली जन्मस्थल सोडूनी श्वशुराच्या गेहीं ॥२६३॥
कृष्णाच्या आशेवर झाला वज्राचा घात ।
जिवत होता नव्हता झाला देहाचा पात ॥२६४॥
फुलणाऱ्या बागेला अगदीं जाळुन टाकावें ।
भयाण निर्जन कानन त्याचें करून सोडावें ॥२६५॥
वसतकाळीं फुलणाऱ्या वेलाला उपटावें ।
वाळायाला दूर नेउनी उन्हांत फेंकावें ॥२६६॥
प्रासादावर किंवा जैसा नांगर फिरवावा ।
होता कीं नव्हता ऐसा तो करून टाकावा ॥२६७॥
एखाद्याला गिरिशिखराहुनि खालीं लोटावा ।
देह तयाचा चूर्ण खरोखर करून टाकावा ॥२६८॥
अशी जाहली उद्वेगास्थिति त्याच्या चित्ताची ।
मनात भेसूरता वाढली निजजीविताची ॥२६९॥
मितभाषी जाहला कुणासह फार न तो बोले ।
स्मशानशांती नित्य तयाच्या मुखावरी खेळे ॥२७०॥

निरुत्साह निर्मोद निर्वातीं निवसे नितकाळीं ।
निकट निवासी निजजन निष्प्रेमानें निदाळी! २७१॥

त्यानें बालविलासस्थानें नेत्रें पाहावीं ।
निश्वासाची वायूलहरी त्यावर सोडावी ॥२७२॥

विरहाच्या ओघानें वाहत सरितेवर जावें ।
तिच्या प्रवाहीं अपुले बाष्पप्रवाह मिसळावे ॥२७३॥

लता चमेली करून सन्मुख बोलत बैसावें ।
दुपार होऊन जावी भान न जाण्याचें व्हावें ॥२७४

करी मुग्ध सृष्टीशी भाषण चालत असतांना ।
स्तब्ध राहुनी पहात राही गगनीं तारांना ॥२७५॥

कधीं मनाला देई मोठे वेदांती पाठ ।
"उदास झालेले धरिती परमार्थाचा कांठ" २७६॥

* ( १६ ) *

उधळीत पुष्पें वृक्षशिरावर वसंत सरसरला ।
विरहि जनांच्या विरहाचा वरती बिंदू चढला॥२७७॥

घोंस लटकुनी आंब्याचे लवली त्यांची झाडी ।
निसर्ग पंडित कोकिळ तिजवर पंचमरव काढी॥२७८॥

समीर काढी सर्व दिशांना धुवून गंधानें ।
मधुकर गुंजारव वेलीवर करि आनंदानें ॥२७९॥

द्राक्षलतांचे मंडप सुकलेले झाले हिरवे ।
गृहोपवनिं येऊन खेळती त्यावरती रावे ॥२८०॥

त्या छायेच्या तळीं प्रवासी बसला येऊन ।
समोरून कुणि ललना आली घागर घेऊन ॥२८१॥

ऊन लागुनी वहात होत्या घामाच्या धारा ।
टोपी काढुन हातरुमालानें घेई वारा ॥२८२॥

सुकलें त्याचे तोंड ओठही गेले वाळून
पाण्यासाठीं पहात होता डोळे लावून ॥२८३॥

मृगनयनेनें तयास बघिलें दुरून निरखून ।
जरा चमकुनी झरझर आली जवळी चालून ॥२८४॥

" किती वाळलासी कृष्णा ! का पायीं आलास ? ।
आठकोस चालणे खरोखर थकून गेलास ॥२८५॥

पाणी घे लोटी आहे कां ? चल अथवा गेहीं ।
तिकडच्यास येईल कळवळा पाहुन या देहीं ॥२८६॥

" या देहाची कशास चिंता राधे ! वाहावी ।
होळी होउन गेली रक्षा पायीं तुडवावी ॥२८७॥

वृक्ष उलथला बागेमधला गेला वाळून ।
करावयाचें काय तयाची चिंता वाहून ॥२८८॥

असेल आशा जिवंत ज्याची चिंता ती त्याची ।
उत्पत्तिच होईना आशेविण गे ! चिंतेची ॥२८९॥

पाण्यावर जल बुद्बुद् उठतो वहात तो जातो ।
फुटून कोठें प्रवाहमार्गी जलामध्यें विरतो ॥२९०॥

मेघ वर्षला गवत उगवलें जें हिरवेंगार ।
कुजून किंवा जळून कोठें रानीं पडणार ॥२९१॥

तसें जाहलें जिवीत माझें आतां निःसार ।
एक मार्ग जो दिसतो तिकडे त्यास लावणार ॥२९२॥
परोपकारीं या देहाचें चंदन घासून ।
साधुजनांना लावावें तीर्थी संतोषून ॥२९३॥
विचार गंगेमधें तयाच्या करूनीया स्नान ।
बुद्धीच्या शुद्धीचें कांहीं मिळवावें ज्ञान ॥२९४॥
त्या ज्ञानाच्या दीपानें जागृति चैतन्याची ।
होउन घ्यावी दीक्षा कर्माच्या संन्यासाची ॥२९५॥
जाळुन षड्रिपु आत्म्याशीं जगदात्मा मिळवून ।
अद्वैताचें निशाण घ्यावें हातीं उभवून ॥२९६॥
त्याच्याखालीं जमवावें विश्वांतिल भावांला ।
निजस्वरूपी विलीन व्हावें मंगलकालाला ॥२९७॥
या संकल्पें आज निघालो सोडुन सर्वांला ।
होती इच्छा बघावयाची जातांना तुजला ॥२९८॥
शेवटची ही भेट, बोलणें शेवटचें आहे ।
सुखी रहा स्नेहाची सरिता विशुद्ध मम वाहे"॥२९९॥

* ( १७ ) *

खिन्न जाहली बालगड्याच्या औदासिन्यानें ।
विचार सुटतां व्हावें जैसे भ्रांतसुबुद्धीनें ॥३००॥
होईल कां उपयोग ह्मणाली माझ्या वदण्यानें ।
बोलूं कां थोडेंसें कुण्णा ! अल्पज्ञानानें ? ॥ ३०१ ॥

" आला नाही योग जुळूनी अपुल्या दोघांचा ।
नाश जाहला परस्परांच्या आशावृक्षांचा ॥ २०२ ॥
ज्या प्रीतींना गंगायमुनांची उपमा दिधली ।
सिंधु ब्रह्मपुत्र नदांची उपमा ती ठरली ॥ २०३ ॥
परंतु ब्रह्मपुत्रीसाठीं सिंधु न वैरागी ।
उगमस्थानीं हिमालयावर वसती अनुरागी ॥ २०४ ॥
माझी प्रीती पूर्वी होती ती आजी आहे ।
तुझीहि कांहीं न्यून नसे अंतर थोडें आहे ॥ २०५ ॥
विशिष्ट इच्छातृप्ती नाहीं प्रीतीचें चिन्ह ।
जडदेहाचें सुखसेवन ना प्रेमाची खूण ॥२०६॥
पवित्रता-प्रिय-स्वार्थ निरामय स्नेहानें सदय ।
खऱ्या प्रीतेचें हृदय असावें असलें दिव्यपय २०७
स्वार्थपरायण निजहिततत्पर पशुतुल्याचारी ।
प्रीतीचें वैडंबन करिती मूढ दुराचारी ॥२०८॥"

* ( १८ ) *

" शिवाय दुसरा विस्मय ऐसा वाटे कीं मजला ।
गुंफाया चुकशी कैशी परमार्थाची माला ॥२०९॥
मानव जन्मोचित तव साध्या कोण न गाईल । !
प्रपंच करुनी परि तें कां तुज साध्य न होईल॥२१०॥
एकनाथ दामाजी तैसे कबिर तुकाराम ।
प्रपंच करुनी यांनीं वरिले मोक्षाचें धाम ॥२११॥

" प्रपंच करुनी परपार्थांचा लाभ जयें केला ।
भला भला नर ! " कसा विसरशी त्याच्या वचनांला ॥ २१२
खरें सांगतें तुवां न व्हावें रुचिरा ! बा कष्टी ।
सोप्या असती ब्रह्मज्ञानी बोलाया गोष्टी ॥ २१३ ॥

एकच इच्छा तृप्त न झाली आयुष्या विटशी ।
दुर्दमनीय कसे कामादिक पराभूत करिशी ॥ २१४ ॥
परोपकारा पासुन जो मार्गाला अनुसरतो ।
जननीच्या उपकाराला तो कैसा विस्मरतो ? ॥ २१५ ॥
बाबाशींही कृतघ्न होशी कृष्णा ! सांग कसा ? ।
वृद्धपणीं चाललास ज्यातें सोडूनी ऐसा ॥ २१६ ॥
मातेचा हा द्रोह तसा पितृव्याचा घात ।
मोक्ष राहिला करितिल हे भलताच अधःपात ॥ २१७

* ( १९ ) *

मला वाटतें काय तुला तें सांगूं कां कृष्णा । ?
तुवा असावें संसारीं आनंदी ही तृष्णा ॥ २१८ ॥
तुला पाहतां कष्टी, माझें मन होतें कष्टी ।
बालपणाच्या सहवासाच्या आठवती गोष्टी ॥ २१९ ॥
निघून कोठें जाशील माझी हुरहुर वाढेल ॥
या संसारीं तुजविण मजला सौख्य न वाटेल ॥ २२० ॥
झाली माझ्यामुळें सुखाच्या स्नेहाची माती ।
हीच सर्वदा मनास या माझ्या जाळिल खंती ॥ २२१

त्वत्स्नेहाच्या खुणा उमटल्या हृदिं जागोजाग ।
काय करूं मी तुझ्या सुखास्तव तें तरि मज सांग" ॥३२२

* ( २० ) *

सोड घटांतिल थोडे पाणी हातानें पीतों ।
निरोप दे इतकेंच करी, हां आतां मी येतों ॥३२३॥
भेटी होतिल आठा दिवसांनी जर येशील ।
याच ठिकाणीं पाय मला हे घेउन येतील ॥३२४॥
भेट न होता पत्र इथें मी लिहून ठेवीन ।
"विचार करितों"–म्हणून गेला तो झाडीतून ॥३२५
विषादमय वृत्तीनें होती तयास पाहात ।
दीर्घ उसासा टाकित ये, अश्रूना ढाळीत ॥३२६॥

* ( २१ ) *

तारुण्याच्या मदास शिवतां लक्ष्मीचा गर्व ।
पाय घसरला नाहीं ऐसे नसती हो! सर्व ॥३२७॥
तशांत कोणी शास्ता नसतां वर्तन तें स्वैर ।
न्याय नीति दोघांचें घडतें बुद्धीशीं वैर ॥ ३२८ ॥
जनक निवर्तुनि माधव झाला मालक मुखत्यार ।
जानव्यास किल्ल्यांची लावी कडी चोंसदार ॥ ३२९ ॥
जमूं लागला दुर्व्यसनी लोकांचा समुदाय ।
उडून जाणाऱ्या पक्ष्याचा समूह कीं काय ॥ ३३० ॥

मधुकर जमले मधा भोंवती जे शाळूस्नेही ।
कृतज्ञतेची स्मृति केंव्हां ज्या होणारी नाही ॥२२१॥

आज काय तर गाणें आहे इंदुरवालीचें ।
उद्यां पुण्याच्या नाइकिणीचें नर्तन व्हायाचें ॥२२२॥

नाच तमाशे मजलस जलसे मोठाले खाने ।
द्रव्यजलाचा पूर वाहतो भरून कांठानें ॥२२३॥

दुर्मार्गीं ती लक्ष्मी जातां गृहलक्ष्मी रडली ।
तुफानात सुमतीची नौका झाली वर खालीं ॥२२४॥

पिऊं लागल्या जळवा चरचर द्रव्याचें रुधिर ।
राधेची विनवणी न ऐके झाला तो बधिर ॥२२५॥

मित्र मंडळी माधवरावांची गाई कीर्ति ।
दुर्व्यसनाच्या घर्की त्याला ओढोनी नेती ॥ २२६ ॥

चहामागुनी कॉफी आली सोडाही आला ।
बंदी व्हावी कैशी मग काचेच्या ग्लासाला ॥२२७॥

घरांत किन्नर बाला असतां सुचले बेढंग ।
उडूं लागले ख्यालखुशालीचे मोठे रंग ॥ २२८ ॥

* ( २२ ) *

व्यसनी लोकाच्या वृत्तीला नसतो धरबंद ।
सदसन्निर्णय शक्ति जाउनी होतो तो अंध ॥ २२९ ॥

एके दिवशीं धुंद होउनी तो अर्ध्या रात्रीं ।
गेहीं आला जागी होती राधा रसपात्री ॥ २४० ॥

म्हणे " सांग बागेंत कुणाशीं बोलत होतीस " ।
पुरे पुरेसें केलें त्यानें विचारुनी तिस ॥ ३४१ ॥

दावानल पेटला जलानें कैसा विझवावा ।
समुद्रांत सांचला गाळ तो कैसा काढावा ?॥ ३४२॥

धडधडली छाती राधा झाली गोरीमोरी ।
क्रोधावेशें त्यानें केली तोंडाची मोरी ॥ ३४३ ॥

जीव तोडुनी सांगत होती खऱ्या खऱ्या गोष्टी ।
बेशुद्धाला विशुद्ध गोष्टी शिकवी बिंब्रोष्टी ॥ ३४४ ॥

वीष ओतिलें कानामध्यें कोणी अधमानें ।
ताळ सोडिला करूं लागला ' फू फू " रामानें ३४५

अमलामध्यें रमला, भ्रमला कमला ना गमली ।
झालाचा "श्री गणेश 'झाला, बाला ती रडली ३४६

* ( २३ ) *

पतिव्रतेचें अमोल भूषण पातिव्रत्त्याचें ।
त्याची घेतां शंका जळतें कोमल मन त्याचें ॥३४७॥

साधूनाही वंद्य तपस्विनि पतिव्रता रामा ।
राष्ट्राला पोंचवील उन्नतिच्या मंगलधामा ॥ ३४८ ॥

दुःखाला जाळील सती विरहाला गाडील ।
शोकाला हटवील भयंकर चिंता नाशील ॥ ३४९ ॥

निघेल जेथें तिचा सुखाचा आनंदोच्छ्वास ।
येइल उद्यानाची शोभा निर्जन रानास ॥ ३५० ॥

निश्वासाचा वायु जिथें ती दुःखें सोडील ।
नंदनवन शक्राचें त्याला वणवा लावील ॥ ३५१ ॥

वैभवशिखरापासुन सम्राटाला ओढील ।
राजनीति संपन्नाच्या बाप्पाला गाळील ॥ ३५२ ॥

इच्छाशक्तीनें देवाला लघुत्व आणील ।
काळालाही निजप्रभावें परतुन लावील ॥ ३५३ ॥

कसा कळावा उन्मत्ताला प्रताप साध्वीचा ।
हर ! हर ! तिजला घालविली हा प्रभाव माध्वीचा[1] ३५४

* ( २४ ) *

उभी राहिली ढाळित अश्रू दाराशीं अबला ।
गाढ तमाच्या मेघामध्यें चमके जणुं चपला ॥३५५॥

तेथूनहि नीचानें खवळुन तिजला घालविली ।
व्यसनार्तानें सुखांत अपुल्या माती कालविली ।३५६।

काकाच्या कंठात हिरकणी अविचारें पडली ।
चंचुघात करुनी दुष्टानें तिजला घालविली ॥ ३५७ ॥

मर्कटास मोत्यांची कंठी घालाया दिधली ।
गळ्यांतुनी काढून तयानें छिन्नभिन्न केली ॥ ३५८ ॥

सुंदर कविता रसहीनाला वाचायास दिली ।
मूर्खपणानें तिची तयानें विडंबना केली ॥ ३५९ ॥

तिनें कुठें जावें अपरात्रीं कोणाच्या सदनीं ।
शिव ! शिव ! होइल नवा विषय तो लोकांच्या वदनीं ३६०

---

१ दारूचा.

आकाशातिल कुऱ्हाड पडली त्रिभुवन आठवलें ।
डोंब उसळला आगीचा दुःखाच्या स्नेहजळे ॥३६१॥

हात जोडुनी ह्मणे–"ईश्वरा प्रसंग हा काय ।
सर्वचक्षु तू असून बघवे अनर्थ का? हाय ! ॥३६२॥

सन्मार्गी लावाया झटणें बालस्नेह्याला ।
हाही का अपराध असो ही शिक्षा का त्याला? ३६३॥

कसें दाखवूं जननीजनकांना काळें तोंड ।
नेवोनी मृत्यूच्या गेहीं देवा मज कोंड ॥३६४॥

धरणीमाते ! दुभंग होई दे मजला वाट ।
या हो कोणी काढा माझ्या रक्ताचे पाट ॥३६५॥

व्याघ्रा ! ये रानातुन घाली भक्ष्यावर झाप ।
वश करो येवोनी माझ्या देहाला साप– ॥३६६॥

दिक्पालांनों ! मरुद्गणानों ! आकाशातुन या ।
न्या कोठें तरि उडवून तुमची ही विमला तनया ३६७।

मेघांनों ! मोठाल्या गारा पाडा वरतून ।
जागोजागी चूर्ण कराया तनूस ठेंचून" ॥३६८॥

* ( २५ ) *

मार्गाच्या बाजूला झाडाखालीं बैसून ।
गाल आपुले भिजवित होती केऱ्हांपासून ॥३६९॥

विचार कांही करून पुनरपि दाराशीं वळली ।
हांक मारिली "अहो !" आंतुनी स्वारीही आली ३७०

निजनाथाचे घट्ट पाय साध्वीनें आंवळले ।
पुष्पासम बाष्पाचे बिंदु त्यावर बरघळले ॥२७१॥

" नका नका लाथाडूं ऐशी दासी पायाची ।
अपराधी मी नाही अगदी पवित्र देहाची ॥२७२॥

अशी मला लोटून कुठेंशीं नाथा ! घालवितां ।
प्रेमाच्या ज्योतीला हातें कैशी मालवितां ॥२७३॥"

पाषाणाला झरा न फुटला थोडा ना द्रवला ।
डोळ्यावरची धुंदी कांहीं सुचूं न दे त्याला ॥२७४॥

मूर्खपणाचा कळस जाहला सीमा ना उरली ।
चालोनी आलेली लक्ष्मी त्यानें घालविली ॥२७५॥

सहनशीलता गेली मुद्रा झाली गंभीर ।
तेज चमकलें लोचनात सुमतीला ये धीर ॥२७६॥

भविष्य काळाकडे फेकली नजर एकवार ।
त्याचे उग्रस्वरूप दिसलें नयनी अनिवार ॥२७७॥

उत्कर्षावर किरण फेंकिले अवनतिला बघिलें ।
कटाक्ष सत्याला मारूनी असत्य निरखीलें ॥२७८॥

सत्वनिष्ठ आर्येचा ठरला कृतनिश्चय पुढचा ।
पाठ फिरविली पदर घेतला खांद्याच्या वरचा ३७९

नीच माधवा ! पहा चालली भाग्यश्री रुसुनी ।
पश्चात्ताप तुला व्हायाचा आहे मागूनी ॥२८०॥

तिच्या मनानें काय ठरविला पुढचा संकल्प ।
तुह्मा आह्माला येई जाणावया कसा अल्प ॥२८१॥

बघता बघतां दुर्मुखलेली ती गेली रजनी ।
धुंदीतच माधव होता तो व्यसनाचा भजनी ॥३८२॥

* ( २६ ) *

दुराचरण पथ पोंचवील दुर्गतीस मूढांना ।
कितीक ठेंचा मधें लागतिल जातांजाताना ॥३८३॥
ज्यास लागली गळती ऐसा द्रव्याचा साठा ।
नष्ट होउनी जाइल असला जरी कुबेराचा ॥३८४॥
वहात असतां सुकून जातें सरितेचें नीर ।
उघडे पडती रुक्ष वालुकामय दोन्ही तीर ॥३८५॥
भणग भिकारी तशी माधवाची दुःस्थिति झाली ।
डागदागिनें विकून शेतें गहाणही पडली ।।३८६॥
पाय काढिती स्नेही जमलेले वैभवकाळीं ।
व्यसनपूर्ति राहो खाण्याची भ्राति तया पडली ३८७
चैन भोगिली ज्यांनीं त्याच्या जिवावरी पूर्वी ।
त्याला बघतां तोंड वळविती जातांना मार्गी ॥३८८॥
बसे एकटा निढळाला लावोनीया हात ।
मीच ह्मणे मूर्खानें केला सर्वस्वी घात ॥ ३८९ ॥
राधेची स्मृति होतां खळबळ माजे हृदयांत ।
जीव नकोसा वाटे जावें निघून रानांत ॥ ३९० ॥
वस्त्रभूषणें तिची पाहतां कढ येती स्वमनी ।
पत्र तिच्या नांवाचें येई त्याला आढळुनी ॥ ३९१ ॥

तें कृष्णाचें पत्र वाचुनी विस्मित तो झाला ।
" पतिव्रतेचा हाय " ह्मणे मी घात कसा केला! ३९२

जीव तोडुनी सांगत होती होतों मी अमलीं ।
मला द्रौपदी कृष्णाची जारिणी कशी गमली ॥३९३॥

शिरीं धरावी कुसुममंजिरी मी पायीं तुडिली ।
विरहाच्या ज्वालेंत सुंदरी ढकलोनी दिधली ॥३९४॥

जनकाच्या गेहींहि न गेली कळली ना वार्ता ।
भटकत कोठें असेल आता हरिणी दुःखार्ता ॥३९५॥

असेल किंवा नसेल कोणी सांगावें हाय ! ।
करूं काय सहवेना मज या पत्राचा घाय ॥ ३९६ ॥

काय राहिलें येथे माझें कशास मी राहूं ? ।
संशोधन करण्यात तिच्या हें आयु कां न वाहूं ? ३९७

भेट न झाली तर कोठें तरि तीर्थस्थानात ।
निवास करुनी आयु घालविन ईश्वरभजनात। ३९८॥

* ( २७ ) *

अखिल सृष्टिला हासविणारा सविता भगवान ।
पूर्व दिशेच्या कठीं घाली कर कांतीमान ॥ ३९९ ॥

नीलनभीं मेघांचीं खंडें पूर्वेच्या भागीं ।
सागरांत तरळती जणों बर्फ जागोजागीं ॥ ४०० ॥

गगन विहारी हिमगिरी शिखरे शुभ्रपीत झाली ।
बघावयाला हवी स्वतां शोभा प्रात:काळीं ॥ ४०१ ॥

नील तमाल कदंब तरुवर अनेक खगजाती ।
प्रातःस्तोत्रें प्रसन्नतेनें कंठभरें गाती ॥ ४०२ ॥

गंगेच्या जललहरींवर बालार्कांचीं किरणे ।
तिनें जणों धारण केलीं तीं सुवर्ण आभरणे ॥४०३॥

पवित्र मंगल असे हरीचें द्वार हरिद्वार ।
दर्शनमात्रें त्रस्त मनाला शांती देणार ॥ ४०४ ॥

पापकिल्मिष भ्रांताच्या ध्वांताला हरणार ।
संसाराचें गुलाम त्यांना कसचें दिसणार ॥ ४०५ ॥

वृक्षलता पाषाणाहि जिथले पावन करणार ।
गाऊं म्हटली महती तरि ती कितीक गाणार ॥४०६॥

साधुसंत बैरागी जमले श्रीगंगास्नानीं ।
धर्मसागरांतलि विलसतीं कमले त्या स्थानीं ॥४०७॥

भगवद्गीता गंगालहरी संध्यागायत्री ।
पुण्यात्म्यांचीं मनें रंगलीं असल्या पावित्र्यीं ॥ ४०८ ॥

तीर्थंकर साधूंचे मेळे अनेक तीर्थांचे ।
जमाव जमले व्योमीं लकलकणाऱ्या ताऱ्यांचे ॥४०९॥

त्यांत एक तेजस्वी एका बाजूला बसला ।
पहात होता भागिरथीच्या प्रवाह नीलजला ॥४१०॥

बैराग्याची झळकत होती मुखप्रभा स्वच्छ ।
लेखित होती दृष्टी त्याची जगताला तुच्छ ॥ ४११ ॥

त्याजकडे टक लावुन कोणी युवक दुजा पाहे ।
सहज कळावें कीं हा विरही जळत मनीं आहे ४१२

काय तयाला शंका आली जवळ पुढें येई ।
बोलायाला धैर्य न होई पहात परि राही ॥ ४१३ ॥

" तोच असावा काय खरें हा ? हो शंका नाहीं " ।
" कृष्णा " ह्मणुनी हाक मारितां तो वरतीं पाही ४१४

गेली नव्हती छाया अजुनी शंकेची होती ।
तुरळक मेघांची विलसावी जैशी भूवरती ॥ ४१५ ॥

मेघ वितळले प्रकाश पडला गहिंवरुनी वदला ।
कृष्णा ! सोडी मधुर तुझ्या वाणीच्या प्रेमजला ''४१६

स्तिमित दृष्टि हासली जराशी विस्मितही झाली ।
निजस्थितीचा पडदा सरला पूर्वस्थिति आली ।४१७।

ह्मणे " माधवा ! अकस्मात ही पडे कशी गांठ ।
राधा मैत्रिण कुठें सोडिली जन्माची गांठ ॥ ४१८ ॥

हरिणाचा मृगजलांत व्हावा जैसा तर्क वृथा ।
तसें होय माधवास त्यानें कथिली आत्मकथा ॥४१९

त्यानें तेथें बसून गंगायमुना वाहविल्या ।
कृष्णाच्या वैराग्यवृत्तिही बऱ्याच हालविल्या ॥४२०॥

" उगा रहा तूं, शांत हो जरा, करूं तिचा शोध ।
विपत्तींत सूज्ञानें द्यावा धैर्याचा बोध ॥ ४२१ ॥

आत्मघात करणारी नाहीं माझी स्नेहीण ।
असेल कोठें पवित्र जागीं तरुण तापसीण ॥ ४२२ ॥

चल जाऊं त्या पलीकडे मम आश्रम कुटिकेला ।
अशोक वृक्षाखालीं घेई विशोक शांतीला ॥ ४२३ ॥

* ( २८ ) *

प्रभावान रवि एक दुजा शशि गतप्रभा मात्र ।
नसे पौर्णिमा राधा झाले ह्मणून एकत्र ॥ ४२४ ॥

लक्ष्मण वैरागी अनुरागी रामचंद्र दोघे ।
तपोवनी हिंडती जणों सीताविरहावेगें ॥ ४२५ ॥

हरिद्वाराचा प्रसिद्ध आला कुंभाचा मेळा ।
तीर्थी झाल्या साधुसंतिणी लक्षावधि गोळा ॥ ४२६ ॥

वाट सांपडेना जाया दर्शन घेण्यासाठीं ।
दहा वाजले कमी न झाली साधूंची दाटी ॥ ४२७ ॥

धवलवसन नेसली अशी कुणि धवलांगी तरुणी ।
भागिरथीची मूर्तिच दुसरी पुण्याची जननी ॥४२८॥

उभी राहिली वाट मिळेना कटाळुन गेली ।
रीघ मिळेना तशीच दाटीमधें सती शिरली ॥४२९॥

फूल चिरडलें खालीं पडलें आरोळी उठली ।
कसचे साधू तुडवित होते तिजला पायतळीं ॥४३०॥

परोपकारासाठीं ज्यानें निजजीवित वहिलें ।
असा एक तापसी धांवला उचलोनी धरिलें ॥ ४३१ ॥

रेटारेटी करून तिजला घेऊनी वळला ।
शुद्धी नव्हती तिजला आला घेउन कुटिकेला ॥४३२॥

* ( २९ ) *

विवेक मन दोघांची पडली बुद्धिसवें गांठ ।

बुद्धिहि ये शुद्धीवर चाले तैं प्रीतीपाठ ॥ ४३३ ॥

" जन्म दिला कृष्णा ! मज दुसरा, मेल्यें मी असतें ।

पवित्र तीर्थी या देहाचें सार्थक बा ! होतें ॥ ४३४ ॥

तुझा जन्म माझ्या सौख्याला कारण हा व्हावा ।

माझा मात्र कसा त्वद्दु.खीं कारण बा व्हावा ॥४३५॥

असो इथें गाठीं पडल्या हा प्रेमाचा योग ।

किती साहिले मजसाठीं तूं क्लेशाचे भोग ॥ ४३६ ॥

अतां उभयता प्रपचातुनी झालों वैरागी ।

ध्येय एक परमार्थ तयावर दोघे अनुरागी ॥ ४३७ ॥

राधे ! नाहीं रुचत तुझें हे भाषण मजलागीं ।

तुझें ध्येय बघ मुख फिरवोनी 'माधव' अनुरागी ४३८॥

धर्म अर्थ कामानें असशी तूं ज्याशीं बद्ध ।

पश्चात्तापें पापें जळुनी तो झाला शुद्ध ॥४३९॥

त्यास टाकुनी विरहानलिं तुज कैचा परमार्थ ।

**साध्वी स्त्रीचा पतिसेवा हा ह्मटला परमार्थ" ४४०**

माधव बोले-" आहे देवी तव मी अपराधी ।

देवानें द्यायाची दिधली शिक्षा मज आधीं ॥४४१॥

तुला द्यावयाची जर आतां असेल मज शिक्षा ।

कटाक्ष मारुन विद्ध करी यापुढें रोज वक्षा" ॥४४२॥

"इश्श! काय बोलणे शोभतें समक्ष कृष्णाच्या ।
सेवा सांगाव्या मज नाथा! अपुल्या चरणाच्या" ४४३

बोले हांसोनी "नाथा पण मी कृष्णावीण ।
गृही यावया रुसेन त्याची लहान मैत्रीण" ॥४४४॥

बोले माधव—"आनंदाच्या बा उगमस्थाना ।
एक विनंती तुला करितसे करणें ती मान्या ॥४४५॥

माझ्या रुक्मिणी भागिनीचा हो कुंकुम तिलक रवि ।
प्रीतीच्या मैत्रिणीवरी या छाया बा! फिरवी" ४४६॥

ह्मणे–"कशाला मला पाडितां या मायामोहीं ।
जा दोघे ससार करा आनंदाने गेहीं" ॥४४७॥

"बोलु नको तोडुन असें मी पाय न उचलीन ।
माझ्या शुद्ध प्रेमाची तुज शपथहि घालीन ॥४४८॥

मनोरमा काकू मज पुसतिल सांगू काय तयां ।
बाबांचा घालवूं कसा चित्ताचा खेद लया" ॥४४९॥

वदतां वदतां येती डोळे भरून राधेचे ।
विरून गेला ह्मणे–"नको गे! कारण खेदाचें ४५०॥

तुझ्या सुखास्तव तूं जे ह्मणशी आचरीन त्यातें ।
सुखी रहावेंसि मात्र तूं खरी ही इच्छा मातें ॥४५१॥

दुसरे दिवशी त्रयवर्गानीं प्रयाण करितांना ।
पुनः पुनः अवलोकन केले रमणीय स्थाना ॥४५२॥

* ( ३० ) *

आज अहा! दामोदरपंतांच्या सदनी हर्ष ।
खेळत होता सर्व सुखांचा झाला उत्कर्ष ॥४५३॥

मनोरमाबाईला तर कृष्णाला पाहून ।
आनंदाचें रडेंच आले अश्रू वाहून ॥४५४॥

ती पोटाशीं तयास धरुनी प्रेमें कुरवाळी ।
मातेच्या प्रेमाहूनी मी विश्वाहि ओवाळी ॥४५५॥

"कृष्णा! कृष्णा!" ह्मणे सुचेना पुढचें वदणें तें ।
अत्यानंदानें थोडेसें वेडें मन होतें— ॥४५६॥

ज्या सांगाया उचित गोष्टि त्या सांगितल्या त्यानीं ।
खुणावित होते परस्पराना हांसत नयनांनीं ॥४५७॥

राव ह्मणाले- " बरें यापुढें सांभाळुन वागा ।
आतां ठेवू नका आमच्या दुःखाला जागा ॥४५८॥

प्रसन्न दामोदरपंतांनीं प्रेमें कृष्णाचें ।
लग्न करूनी शांतविलें मन त्याच्या मातेचें ॥४५९॥

तीन भाग जिनगीचे केले समान वाट्याचे ।
एक दिला दत्तकास दोघे राधाकृष्णाचे ॥४६०॥

राधा माधव कृष्ण रुक्मिणी यांचा संसार ।
वृद्ध जनांच्या कौतुकास झाला कारण फार ॥४६१॥

कृष्ण सखा जाहला सुखी निर्व्यसनी पति झाला ।
**प्रसन्न-राधा** कुरवाळी ती नवीन भावाला ॥४६२॥

* ( २१ ) *

जिवंत असता स्नेह ठेवणारे सापडतील ।
मागेंही विसरती न ऐसे थोडे असतील ॥४६३॥
दिव्यस्नेहाच्या मर्माला जाणत नसतील ।
दामोदरपंतांची मैत्री त्यांना शिकवील ॥ ४६४ ॥
मन:संयमी विरही राधा कृष्णाची जोडी ।
प्रेमाला लावील वाटते नीतीची गोडी ॥ ४६५ ॥
माधव तो व्यसनी लोकांना करील कीं जागें ।
" सावध व्हा ज्या झाल्या गोष्टी विसरा त्या मागें " ४६६

समाप्त.

REFBK-0001828